रयत शिक्षण संस्थेचे

## आर्टस, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## महिला सक्षमिकरण समिती व इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विदयमाने

# जोडीदाराची विवेकी निवड

## संवादशाळा

दिवस: शनिवार                दिनांक:८/०2/२०२०

## अहवाल

आर्टस,सायन्स व कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर,(बुली) ता. पलूसस, जि. सांगली या ठीकाणी जोडीदाराची विवेकी निवड या संवादशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर संवादशाळा इंग्लिश विभाग व महिला सक्षमीकरण समितीच्या वतीने शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२० रोजी आयोजित करण्यात आली होती.

संवादक म्हणून स्वाती कोरे व हर्षल जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जोडीदाराची विवेकी निवड का गरजेची आहे ? ती कशी करावी ? प्रेम आणि आकर्षण यांतील फरक, जोडीदाराबददल आपल्या अपेक्षा, आधुनिक कुंडली, लग्नापूर्वी कराव्या लागणा-या वैद्यकिय तपासण्या सहजीवनातील समानता, प्रेम, जात व लग्न यांच्याशी सबंधीत हिंसा याबददल मार्गदर्शन करण्यात आले.

प्रा. डॉ. मृणालीनी आहेर यांनी स्त्री-पुरुष समतेच तत्व मुल्यं म्हणून स्वीकारुन प्रत्येक कुटुंबातून, शाळा - महाविद्यालयांतून ते रुजवण्याची निकड आपल्या प्रस्तावनेतून मांडली. प्रा. डॉ. मृणालिनी आहेर यांच्या संयोजनातून साकार झालेल्या या संवादशळेमधे विवेकी सहजिवनाशी संबधित पोस्टर्स, घोषवाक्य, रांगोळी असे नेटके आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. औंधकर ए.आर. हे होते, त्यांनी प्राणी व पक्षांमधील सहजीवन यांबर भाष्य केले. प्रा. वनिता राऊत यांनी पाहुण्यांचा परिचय करवून दिला व स्वागत केले. प्रा.सुमय्या नदाफ यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक , बहुसंख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी , विद्यार्थीनी तसेच पत्रकार संदीप नाझरे हे उपस्थित होते.

| लाभार्थी: | निष्पती: |
|---|---|
| १५० | जोडीदाराची विवेकी निवड करण्यामध्ये विद्यार्थी विद्यार्थीनी विचार प्रवण झाले. |





इंग्रजी
विभाग प्रमुख

Principal
Arts, Science & Commerce College,
Ramannadnagar (Burli)